शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी.फार्मसी (प्रॅक्टीस) पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्र.टीईएम-२०१९/प्र.क्र.१९३/तांशि-४

मंत्रालय विस्तार भवन,मादाम कामा मार्ग ,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई .४०००३२

दिनांक : १६ सप्टेंबर, २०१९

वाचा : संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/ फार्म डी/२०१८/८७७, दि.१० जुलै,२०१९

प्रस्तावना :-

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने बी.फार्मसी (प्रॅक्टीस) हा अभ्यासक्रम सुरु करण्यास काही संस्थांना दिलेली मान्यता विचारात घेऊन संचालकांनी वर नमूद दिनांक १०/७/२०१९ च्या पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार शासन मान्यता देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन खालील तक्त्यात नमूद संस्थेस त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी.फार्मसी (प्रक्टिस) हा अभ्यासक्रम सुरु करण्यास पुढे नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	संस्थेचे नांव	अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता	संलग्नीत विद्यापीठ
१	अभिनव एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी (बी. फार्म), पुणे	बी.फार्मसी (प्रॅक्टीस)	४०	डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

२. अटी व शर्ती :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने वेळोवेळी विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

४) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश व शुल्क हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मधील तरतूदीनुसार विहित करण्यात येतील. हे प्रवेश संस्थास्तरावर होत असल्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजन व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

५) संबंधित अधिनियमातील तरतुदीनुसार विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थाने आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

६) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास विहित मानकांनुसार पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके विद्यापीठ अनुदान आयोगाच्या प्रचलित मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

८) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

९) याशिवाय संबंधित विद्यापीठाने घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१०) संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थेकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

११) सदर संस्था वरील अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करते हे सुनिश्चित करण्याची जबाबदारी विद्यापीठाची असेल. कायदेशीर बाबींच्या पूर्तते अभावी वरील अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होणार नाही या संदर्भातील दक्षता विद्यापीठाने घ्यावयाची आहे. यात कसूर झाल्यास विद्यापीठाची सर्वस्वी जबाबदारी राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१६१८५४१३६५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=fcf7172a73579b34fa622983d8fb647780fbef1d35a1ca975955eb9193f3f800, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2019.09.18 15:53:06 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
३. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फ
५. प्राचार्य, अभिनव एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी (बी. फार्म), पुणे
६. प्रबंधक, फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कम्बाईन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-ए-गालिब मार्ग, नवी दिल्ली -११०००२
७. निवड नस्ती/तांशि-४